# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ९६ / २०२४

नवीन वीज जोडणी व नुकसान भरपाई मिळण्याबाबत

विशाल शिवाजी शिंदे....................................................................................................... अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादीत (महावितरण) मुळशी ................................................. प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- विशाल शिवाजी शिंदे

प्रतिवादींतर्फे :- १. आनंद घुले, उपकार्यकारी अभियंता मुळशी उपविभाग
२. शुभांगी कांबळे, उपकार्यकारी अभियंता मुळशी कार्यालय

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- २६ जुलै २०२४

आदेश पारित दिनांक :- २० सप्टेंबर २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण पुणे परिमंडळ (मंच) यांच्या दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या आदेशाविरुध्द सदरचे अभिवेदन दिनांक २१ मे २०२४ रोजी दाखल केले. मंचाने दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ आदेशान्वये अंशतः मंजूर करताना खालीलप्रमाणे निर्देश दिले.

- *सामनेवाले यांना आदेश देण्यात येतो की, तक्रारदारास आदेश प्राप्तीपासून १० दिवसांत नवीन वीज जोडणी देण्यात यावी.*
- *सामनेवाले यांना आदेश देण्यात येतो की, वरील आदेशाचे पालन न केल्यास "मुद्दा क्रं. १(C) " मध्ये नमुद केल्याप्रमाणे तक्रारदारास नुकसान भरपाई देण्यास जबाबदार असणार आहेत.*

म.वि.नि.आ.

२.	मंचाच्या आदेशाने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थीने सदरहू अभिवेदन दाखल केले. दिनांक २६ जुलै २०२४ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात आली. अपिलार्थीने निवेदनातील व सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी यांनी गट क्रं.३४/२/अ मौजे माण, तालूका मुळशी, जिल्हा पुणे येथील मिळकत मेसर्स एफडीसीसी प्रोपा. शब्बीर बाबू यांच्याकडून विकत घेतली आहे. (शब्बीर बाबूने सदर मिळकत पांडुरंग राक्षे आणि इतर यांच्याकडून विकत घेतली होती) गाव नमुना ७/१२ वर ०२.१३ गुंठे (गट क्रं.३४/२/अ) पांडुरंग नानासाहेब राक्षे व इतर यांच्याबरोबर नावाची नोंद झालेली आहे. सदर मिळकतीवर (Ploting) प्लॉटींग स्किम करण्यात आली. अपिलार्थीने त्यांच्या प्लॉटवर दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ रोजी नवीन वीज जोडणीसाठी महावितरणकडे ऑनलाईन अर्ज (क्रं.४७६०१७८७) केला.

- सदर वीज जोडणीचा अर्ज येण्यापुर्वी दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ रोजी श्रीमती कविता जालिंदर राक्षे, श्रीमती पारूबाई नानासो राक्षे, कुमार आदित्य जालिंदर राक्षे यांचा हरकत अर्ज प्रतिवादींकडे देण्यात आला होता, असे समजते.

- अपिलार्थीने सदर वीज जोडणीसाठी उपविभागीय मुळशी कार्यालयाबरोबर वारंवार पाठपूरावा केला, परंतू प्रत्येक वेळी त्यांनी संबधीत अधिकारी आपल्याशी संपर्क करतील व वीज जोडणीसंबधीत योग्य ती कार्यवाही करतील, असे सांगून प्रतिवादीने कनेक्शन देण्याबाबत टाळाटाळ केली. अपिलार्थीच्या मिळकतीपासून काही अंतरावर असलेल्या इतर मिळकतधारकांना वीज जोडणी दिली आहे. तसेच, अपिलार्थीच्या मिळकतीजवळ असलेल्या बेकायदा दुकांनानासुध्दा वीज जोडणी देण्यात आली आहे. परंतू सतत पाठपुरावा करूनही नवीन कनेक्शनबाबत महावितरणकडुन कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

- त्यानंतर अपिलार्थीने दिनांक २८ ऑगष्ट २०२३ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने त्यांच्या दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या पारीत आदेशानुसार परिच्छेद १ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे वीज जोडणी देण्याचे निर्देश दिले.

- त्यानंतर वीज जोडणीबाबत अपिलार्थीने पाठपुरावा केला असता, मीटरची कमतरता असल्याचे सांगण्यात आले. नंतर त्यांनी मीटरची व्यवस्था केली. तेव्हा अपिलार्थीस, 'वीज जोडणी मिळेल' असे वाटले होते; म्हणून अपिलार्थीने काही काळ वीज जोडणीचा पाठपुरावा केला नाही. परतू त्यानंतर वीज जोडणीचा पाठपुरावा केला असता, उडवाउडवीची उत्तरे देण्यात

आली यात बराचसा कालावधी निघून गेला. त्यामुळे वर उल्लेखीलेल्या कारणामुळे माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयात गाऱ्हाणे दाखल करण्यास उशीर झाला.

- अपिलार्थीने नमुद केले की, प्रतिवादीने अपिलार्थीस सदर वीज जोडणीसाठी लागणारा मीटर दिला, तथापि सर्व्हिस वायरने वीज जोडणी चालू करून दिली नाही म्हणजे अस्तित्वात नसलेल्या वीज जोडणीचे माहे एप्रिल २०२४ पासून वीज देयके अदा करण्यात येत आहेत हे चुकीचे आहे.

- दिनांक २ जानेवारी २०२४ रोजी श्री पांडुरंग नानासाहेब राक्षे यांचा हरकत अर्ज महावितरण कार्यालयास प्राप्त झाले. त्यानुसार महावितरण शाखा अभियंता पिरगुट २ कार्यालयाने दिनांक ४ जानेवारी २०२४ रोजी सदर हरकती निवारण करण्यासाठी कळविले.

- श्री. पांडुरंग राक्षे आणि कुटूंबाच्या आक्षेपास समर्थन देणारी इतर सर्व कागदपत्रे अर्थपुर्ण नाहीत, कारण आक्षेप फक्त तात्कालीन जमीन मालक "श्री. पांडुरंग राक्षे व शब्बीर बाबू" यांच्यातील संघर्षामुळे तसेच अपिलार्थीकडून अतिरीक्त पैसे कमावण्याच्या उद्देशाने करण्यात आलेला आहे. 'राक्षे आणि इतर' व श्री. शब्बीर बाबू (Owner of Havenista Project of FDCC Builder) यांच्यात मालमत्ता विकत घेतलयानंतर मालमत्तेच्या किंमतीबाबत काही मतभेद झाले आहेत. अपिलार्थी व "पांडुरंग राक्षे आणि इतर" यामध्ये वैयक्तिकरित्या कोणताही वाद नाही. अपिलार्थीच्या मिळकतीसोबतच इतर मिळकतीतील काही ग्राहकांना व बेकायदेशीर दुकांनाना वीज जोडणी देण्यात आली आहे. परंतू अपिलार्थीच्या वीज जोडणीस आक्षेप का असा प्रश्न निर्माण होत आहे.

- अपिलार्थीच्या मिळकतीवर बांधलेल्या शेडवर महावितरणने वीज जोडणी करून देण्यात यावी व मानसिक छळ आणि आर्थिक नुकसान भरपाईपोटी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम, २०२१ (विद्युत पुरवठा संहिता, कृतीची मानके विनियम, २०२१) नुसार नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

३. प्रतिवादीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २६ जुलै २०२४ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी श्री.विशाल शिवाजी शिंदे यांनी २८ फेब्रुवारी २०२३ रोजी वीज जोडणीसाठी प्रतिवादी महावितरण कार्यालयाकडे अर्ज (क्रं.४७६०१७८७) केला.

- अपिलार्थीचा नवीन वीज जोडणीचा अर्ज येण्यापुर्वी सदरहू जमीनीचे मालक श्रीमती कविता जालिंदर राक्षे, श्रीमती पारुबाई नानासो राक्षे, कुमार आदित्य जालिंदर राक्षे यांनी प्रतिवादींना यांना अपिलार्थीच्या वीज जोडणीबाबत दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ च्या हरकत अर्जाद्वारे खालीलप्रमाणे कळविले.

    - *वर नमुद व्यक्तीसंबधी पुणे येथील न्यायालयात दिवाणी / फौजदारी स्वरूपाचे दावे चालू आहेत. सदर व्यक्ती अनाधिकृतपणे आमचे जमिनीमध्यून ताबा करुन, आपणास खोटी माहिती देवून विद्युत कनेक्शन मागत असल्याचे निदर्शनास आले आहे.*
    - *कारण सदर व्यक्ती आपणासकडे विद्युत कनेक्शनकरीता अर्ज करुन आपणास चुकीच्या माहिती देत असल्याची माहिती आम्हांस मिळालेली आहे.*
    - *तसेच सदर सर्व्हे नं. ३४/२/अ या मिळकतीमध्ये आमचे नावाचे क्षेत्र असून, आम्ही संपुर्ण क्षेत्र विक्री केलेले नाही, वर नमुद व्यक्ती चुकीच्या पध्दतीने, शासनाची व आपली दिशाभूल करुन सदर सर्व्हे नं. ३४/२/अ या मिळकतीवर विद्युत कनेक्शन घेवू पाहत आहेत. त्यामुळे आमची सर्व्हे ३४/२/अ मधील वरील व्यक्तीस विद्युत कनेक्शन देण्याबाबत तीव्र हरकत आहे. याउपरही आपण सर्व्हे ३४/२/अ मधील वरील व्यक्तीस विद्युत कनेक्शन आपण दिल्यास आपल्या विरुध्द योग्य ती **फौजदारी व दिवाणी स्वरूपाची कारवाई करावी लागेल.***

- वीज जोडणीच्या अर्जानुसार 'स्थळ तपासणी' करण्यात आली व त्या ठिकाणी प्लॉटींग स्किम तयार होण्याची शक्यता असल्याने त्या ठिकाणची वीज यंत्रणा सक्षम करणे गरजेचे आहे. त्यानुसार सदर ठिकाणी २०० केव्हीए क्षमतेचे रोहीत्र बसविणे गरजेचे वाटले; तथापि, प्लॉटींगचे आतील रस्ते याबाबत कोणत्याही प्रकारची स्पष्टता नव्हती. एकाच ७/१२ वर २१ लोकांची नावे आहेत. त्यात कोणते क्षेत्र कोणाच्या नावे याची स्पष्टता नाही. त्यामुळे वीज जोडणीचा अर्ज प्रलंबित होता.

- त्यानंतर अपिलार्थीने दिनांक २८ ऑगष्ट २०२३ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली.

- मंचाच्या आदेशापुर्वी अॅडव्होकेट श्री. निरंजन बाळासाहेब ढमाले यांनी श्री.पांडुरंग राक्षे व इतर यांच्यातर्फे श्री. विशाल शिंदे व शब्बीर बाबू यांना दिनांक २ नोव्हेंबर २०२३ रोजी रजिस्टर पोष्टाने नोटीस पाठविली. सदरहू नोटीसमध्ये खरेदीखत ताबडतोब रद्द करुन घ्यावे, अन्यथा त्यांच्यावर दिवाणी वा फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी असे कळविले.

➢ मंचाने दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या पारीत आदेशात सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांत वीज जोडणी देण्याचे निर्देश दिले.

➢ त्यानंतर पांडूरंग नानासाहेब राक्षे व इतर यांनी दिनांक १ जानेवारी २०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिवादींना खालीलप्रमाणे कळविण्यात आले.

> *"मौजे माण ता.मुळशी, जि.पुणे येथिल गट नं.३४/अ तसेच ३५/१ ही शेतजमीन मिळकत असून सदर मिळकत आमचे वडीलपार्जित मालकी हक्काची व कब्जेवहीवाटीची असून सदर मिळकतीपैकी क्षेत्र आम्ही विक्री केले होते सदर व्यवहारात खरेदीदारांनी आमची बोगस बनावट कागदपत्र तयार करून आर्थिक फसवणूक केली होती त्याबाबत माझा भाऊ जयवंत लक्ष्मण राक्षे यांचे फिर्यादी वरुण* ***फौजदारी गुन्हा हिंजवडी पो.स्टे. येथे गु.र.न.६५३/२०११ दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी हा शब्बीर बाबू व इतर खरेदीदारांविरोधात दाखल*** *आहे व त्यांचा तपास अद्याप चालू आहे, तसेच सदर मिळकतीमधील खरेदीखत धारकांना आम्ही त्यांची खरेदीखाते रद्द करणेबाबत दिवाणी कोर्टात दावा दाखल करणार असलेबाबत वकिलामार्फत नोटीस पाठवून देखील कळविले आहे तरी अशा परिस्थितीमध्ये आपले कार्यालयाकडे विद्युत जोडणी मिळणेसाठी अर्ज करणारे इसम त्यांना सदर मिळकतीमध्ये हक्क आहे हे दाखवणेसाठी आपलेकडून विद्युत जद्दोडणी घेऊन मालकीचा पुरावा तयार करू पहात आहे. तरी सदर अर्जदार यांना गाव* ***मौजे माण ता. मुळशी, जि. पुणे येथिल गट नं. ३४/अ तसेच ३५/१ या मिळकतीवर पारस किसन बोरेले, विशाल शिवाजी शिंदे किंवा इतर कुणालाही वीज मीटर कनेक्शन देण्यास आमची तीव्र हरकत आहे याची नोंद घेणेसाठी तसेच हरकत मिळताच कुणालाही वीज मीटर कनेक्शन न देणेसाठी सदरचा अर्ज आम्ही केला आहे."***

➢ दिनांक २ जानेवारी २०२४ रोजी श्री पांडुरंग नानासाहेब राक्षे यांचा हरकत अर्ज महावितरण कार्यालयास प्राप्त झाले. त्यानुसार महावितरण शाखा अभियंता पिरगुंट २ कार्यालयाने दिनांक ४ जानेवारी २०२४ रोजी अपिलार्थीस सदर हरकती निवारण करण्यासाठी कळविले.

➢ एकच शेतीचा सामाईक सात बारा असेल; तर, सात बारावर नावे असलेल्या इतरांचे वीज जोडणी घेण्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र आणने गरजेचे होते. तथापि, अपिलार्थीस तसे सांगितल्यावरही अपिलार्थी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. प्रतिवादींना धडा शिकविण अशी धमकी अपिलार्थींनी दिली.

➢ मंचाच्या दिनांक २१ नोव्हेबर २०२३ रोजीच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी डिमांड नोट देण्यात आली, तसेच दिनांक ३ मार्च २०२४ रोजी मीटर देण्यात आला.

- सदर वीज जोडणीसाठी वरिष्ठ तंत्रज्ञ श्री.संजय जाधव व अपिलार्थींच्या उपस्थितीत वीज मागणीच्या ठिकाणी वीज मीटर लावल्यानंतर वीज जोडणीसाठी सर्व्हिस वायरची जोडणी करत असताना हरकत घेणारे तक्रारदार उपस्थित झाले व त्यांचे व अपिलार्थींचे वीज जोडणीबाबत टोकाचे वादविवाद झाले व तक्रारदारांनी वीज जोडणीस तीव्र हरकत घेतली. सदरील वादविवाद पाहिल्यानंतर वरिष्ठ तंत्रज्ञ श्री.संजय जाधव यांनी अपिलार्थीस सदर वाद व हरकतीचे निराकरण करण्यास सांगितले.

- प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थीने ज्या जागी वीज जोडणीची मागणी केली आहे त्या ठिकाणी प्लॉटींग स्कीम असून तेथे प्लॉट धारकांचे मोठया प्रमाणात अंतर्गत वाद विवाद आहेत. सदरील जागेवरील हरकती निवारण करणे कामी महावितरण शाखा अभियंता पिरगुट २ शाखा यांनी अपिलार्थीस प्रत्यक्ष भेटून किंवा पत्राद्वारे अवगत केले होते. परंतू अपिलार्थी हे सदर हरकती निवारण करणेकामी स्वतः जागेवर उपस्थित राहीले नाहीत. त्यांना सदरील हरकतीचे निराकरण करण्यास महावितरणतर्फे तोंडी, लेखी तसेच, भ्रमणध्वनी द्वारे कळविण्यात आलेले आहे. परंतू त्याबाबत त्यांनी काही कार्यवाही केलेले नाही.

- अपिलार्थींचे कच्चे बांधकाम केलेले पत्राची शेड आहे. वस्तूतः सदर ठिकाणी कोणीही राहत नाही. त्यामुळे घरगुती वीज जोडणी देणे सुध्दा वादातीत आहे. मंचाने आदेश दिल्यामुळे प्रतिवादीने अपिलार्थींच्या घरगुती वीज जोडणीच्या अर्जावर कार्यवाही केली. सदर प्लॉट सिस्टिममध्ये दोन्हीही रस्त्याचे लेआऊट मंजूर केले नसल्यामुळे सर्व्हीस वायर कशी न्यायची याबाबत मतभिन्नता आहे. सदर ठिकाणी जमिनीच्या मालकीबाबतही टोकाचे वाद आहेत.

- अपिलार्थींच्या तक्रारीवर मंचाने दिनांक २१ नोव्हेबर २०२३ रोजी आदेश पारीत केला. अपिलार्थीने विद्युत लोकपाल कार्यालयात 'ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०' मधील तरतूदीनुसार साठ दिवसांत अभिवेदन दाखल करणे अपेक्षीत होते, परंतू सदर अभिवेदन दिनांक २१ मे २०२४ रोजी दाखल केले. विनियम ७.९ नुसार सदर ठिकाणी वाद असल्यामुळे सदरहू अभिवेदन अस्वीकाराहर्य आहे.

- अपिलार्थींना विनंती करण्यात येत आहे की, ७/१२ वर नावे असलेल्या इतर जमिनधारकांची संवाद साधून त्यांचे त्याबाबतचे अंर्तगत व्यवहार प्रलंबित असतील तर ते पुर्ण करण्यात यावे व चांगले वातावरण निर्माण करावे. नंतरच मीटर व सर्व्हिस वायर जोडून देण्यात येईल. अपिलार्थींचे अंर्तगत वाद विवाद प्रतिवादी मिटवू शकत नाहीत, ते अपिलार्थींना सामंजस्याने मिटवावे लागतील. श्री शब्बीर बाबू अटकेत असल्याचे प्रतिवादींना निश्चित माहिती नाही.

> वरील सर्व बाबीचे विचार करता प्रतिवादीने विनंती केली की अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

## विश्लेषण व निर्णय

४. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी यांनी गट क्रं.३४/२/अ मौजे माण, तालूका मुळशी, जिल्हा पुणे येथील मिळकतीवर दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ रोजी नवीन वीज जोडणीसाठी महावितरणकडे अर्ज (क्रं. ४७६०१७८७) केला.

५. अपिलार्थीने नमुद केले की, सदर वीज जोडणीसाठी अपिलार्थीने उपविभागीय मुळशी कार्यालयास वारंवार पाठपूरावा केला असता प्रत्येक वेळी उडवाउडवीची उत्तरे देऊन वीज जोडणीस टाळाटाळ केली. अपिलार्थीने दिनांक २८ ऑगष्ट २०२३ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने त्यांच्या दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या पारीत आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसात वीज जोडणी देण्याचे निर्देश दिले. त्यानंतर वीज जोडणीसाठी मीटरची व्यवस्था केली; परंतू सर्व्हिस वायरद्वारे वीज जोडणी दिली गेली नाही, म्हणजे अस्तित्वात नसलेल्या वीज जोडणीची वीज देयके मात्र माहे एप्रिल २०२४ पासून अदा केलेली आहेत. प्रतिवादी हे नियमानुसार वीज जोडणी देण्यास कटीबध्द आहे त्यामुळे वीज जोडणी करून देणे हे कर्तव्य आहे. श्री. पांडुरंग राक्षे आणि कुटूंबाचे आक्षेपाची कागदपत्रे अर्थपुर्ण नाहीत.

६. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थी श्री. विशाल शिवाजी शिंदे यांनी २८ फेब्रुवारी २०२३ रोजी वीज जोडणीसाठी प्रतिवादी महावितरण कार्यालयाकडे अर्ज (क्रं.४७६०१७८७) केला. सदर वीज जोडणीच्या अर्जानुसार 'स्थळ तपासणी' त लागणाऱ्या पायाभूत सुविधाची पाहणी करण्यात आली. परंतू स्थळ तपासणीपुर्वी वीज जोडणी देण्यासंबधी दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ रोजी व दिनांक २ जानेवारी २०२४ रोजी राक्षे कुटूंब यांचे हरकत अर्ज महावितरण कार्यालयास प्राप्त झाले. त्यानुसार महावितरण कार्यालयाने दिनांक ४ जानेवारी २०२४ रोजी सदर हरकती निवारण करण्यासाठी कळविले. मंचाच्या आदेशानुसार अपिलार्थीस दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी डिमांड नोट देण्यात आली व त्यानंतर दिनांक ३ मार्च २०२४ रोजी मीटर देण्यात आला. मात्र मीटर लावल्यानंतर वीज पुरवठा चालू करण्याकरीता सर्व्हिस वायरची जोडणी करत असताना हरकत घेणारे तक्रारदार उपस्थित झाले आणि त्यांचे अपिलार्थीचे वीज जोडणीबाबत टोकाचे वादविवाद झाले व वीज जोडणीस तक्रारदारांनी तीव्र हरकत घेतली. सदरील वादविवाद पाहिल्यानंतर वरिष्ठ तत्रंज्ञ श्री.संजय जाधव यांनी अपिलार्थीस सदर वाद व हरकतीचे निराकरण करण्यास सांगितले. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थीच्या वीज जोडणीची जागा ही प्लॉटींग स्कीम स्वरुपाची असून तेथे प्लॉट धारकांचे मोठया प्रमाणात अंर्तगत वाद विवाद आहेत. परंतू अपिलार्थी हे सदर हरकती निवारण करणेकामी स्वतः जागेवर उपस्थित राहत नाही. त्यांना सदरील हरकतीचे निराकरण करण्यास महावितरणतर्फे तोंडी, लेखी तसेच भ्रमणध्वनी द्वारे वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे व

हरकतीचे निराकरण झाल्यानंतरच महावितरण अपिलार्थीस वीज जोडणी देतील असे तोंडी आश्वासन त्यांनी सुनावणी दरम्यान दिले.

७. अपिलार्थीची तक्रार ही पोलीस स्टेशन व महसूल विभागामध्ये मध्ये प्रलंबित असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते.

८. मंचाने आदेश दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ रोजी पारीत केला. ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२० मधील विनियम १९.१ अन्वये अपिलार्थीने त्यांचे अभिवेदन मंचाच्या आदेशाच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांत (२ महिन्यात) मा. विद्युत लोकपाल कार्यालयात दाखल करणे आवश्यक होते; परंतू ते दिनांक २१ मे २०२४ रोजी ६ महिन्यांनी उशिरा दाखल केले आहे. म्हणजे विहित वेळेपेक्षा अभिवेदन ४ महिने उशिरा दाखल केले आहे.

विनियम १९.१ खालीलप्रमाणे.

> *"मंचाकडून गाऱ्हाण्याचे निवारण न झाल्याने बाधित झालेल्या ग्राहकाला, थेट किंवा उचित प्राधिकृत प्रतिनिधीच्या माध्यमातून, मंचाच्या आदेशाच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसाच्या आत, गाऱ्हाण्याच्या निवारणासाठी विद्युत लोकपालाकडे अभिवेदन सादर करता येईल.*
>
> *परंतू असे की, सदर कालावधीत अभिवेदन दाखल न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत जर विद्युत लोकपालाची खात्री झाली तर सदर साठ (६०) दिवसांचा कालावधी संपून गेल्यावर तो असे अभिवेदन विचारार्थ स्वीकारू शकेल."*

गाऱ्हाण्याच्या निवारणासाठी मंचाच्या आदेशा विरूध्द अभिवेदन दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापनास योग्य वाटत नाही.

९. सदर अभिवेदन अपिलार्थीने खरेदी केलेल्या जागेवरील वीज जोडणीसाठी इतर जमिन मालकाने घेतलेल्या हरकतीबाबतचे वादाबाबतचे आहे. अपिलार्थीने सर्व वादविवाद संबधित जमिन मालकांसोबत एकत्र बसून सामोपचाराने निवारण करणे आवश्यक आहे. सदर हरकतीवर तोडगा निघाल्यानंतर प्रतिवादींशी संपर्क करून वीज जोडणीबाबतची समस्येचे निवारण करावे.

१०. प्रतिवादींना सुचीत करण्यात येत आहे की, जर सदर जागी अपिलार्थीस वीज जोडणी देण्यात आलेली नसेल; कार्यान्वीत नसेल तर त्यांना वीज देयके देण्यात येऊ नयेत. आणि जर वीज देयके अदा करण्यात आली असतील; तर, ती रद्द बदल करण्यात यावी व अयोग्य वीज देयकाची रक्कम अपिलार्थीने भरली असल्यात ती परत करण्यात यावी.

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

११. मंचाच्या आदेशात कोणताही फेरफार करण्याची गरज वाटत नाही.

१२. अपिलार्थींचे गाऱ्हाणे नामंजूर करण्यात येत असून निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)